जळगांव जिल्हा. महाराष्ट्र (सकाळ दि. 03/07/08)

## उपग्रहाद्वारे सर्वेक्षण

# जिल्ह्यात उपग्रहाद्वारे होणार साथरोगाचे भाकीत

## दिल्लीला तत्काळ संपर्क : आपत्कालीन परिस्थितीत उपाययोजना, उपचारांची सुविधा शक्य

**ज्ञानेश्वर पाटील : सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. ३ : जिल्ह्यात अधूनमधून उद्‌भवणाऱ्या साथरोगांचे भाकीत आता काही दिवस आधीच सॅटेलाइटच्या माध्यमातून समजणार आहे. संपूर्ण भारतात ही 'इंटिग्रेटेड डिसीज सर्व्हेलन्स प्रोजेक्ट' (आयडीएसपी) योजना कार्यान्वित होत आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. जयप्रकाश खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. ए. जी. वडनेरकर यांनी 'सकाळ'ला दिली.



**जळगाव : जिल्हा परिषद इमारतीवर जिल्ह्यात साथरोगाचे सर्वेक्षण करण्यासाठी उभारलेला डिश.**

- **एकात्मिक रोग निगराणी प्रकल्प जिल्ह्यात कार्यान्वित.**
- **राज्यातील ३३ जिल्हा परिषदांमध्ये प्रकल्प सुरू होणार.**
- **महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, जम्मू- काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल प्रदेश ही राज्ये जोडली जाणार.**

डॉ. वडनेकर म्हणाले, की ग्रामीण भागासह शहरी भागात अधूनमधून उद्‌भवणाऱ्या विषमज्वर, कॉलरा, गॅस्ट्रो, गोवर, हिवताप, मेंदूज्वर, लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, कावीळ, पोलिओ यांसह अन्य साथरोगांचेही भाकीत या उपग्रहाद्वारे आता कितीतरी दिवस अगोदर समजणार आहे. त्यामुळे प्रभावी प्रतिबंधक उपाययोजना आणि उपचारांची सुविधा आरोग्य विभागाला करता येणे शक्य आहे. यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागात एक डाटा एंट्री ऑपरेटर आणि एक प्रशासकीय सहायक नियुक्त करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात व्हिडिओ कॉन्फरन्स सभागृह तयार केला असून, याद्वारे दिल्लीला संपर्क साधला जात आहे.

पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता विभागात रात्रंदिवस कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, जिल्ह्यात पूरसदृश किंवा आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवणार असल्यास त्याची पूर्वसूचना या उपग्रहाद्वारे जिल्ह्यास मिळणार आहे. त्यामुळे घटनास्थळी आरोग्याच्या संबंधित आवश्यक सुविधा तत्काळ पुरविता येणार असून, यासंबंधी काही अत्यावश्यक मदत लागल्या तर थेट दिल्लीला आरोग्य विभागाशी संपर्क साधता येणार आहे. त्यामुळे आवश्यक औषधपुरवठा आणि अन्य साहित्यांची रसद जिल्हावासीयांना वेळेत मिळणार आहे. तसेच पूर्वसूचनेवरून धोक्याच्या ठिकाणाहूनही नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविता येणे शक्य होणार असून, जीवितहानीही टाळता येणार आहे.

'इस्रो'च्या (इंडियन स्पेस रिसोर्स

पान २ वर ▶

# जिल्ह्यात उपग्रहाद्वारे होणार साथरोगाचे भाकीत

▶ पान १ वरून

ऑर्गनायझेशन) नियंत्रणाखालीच देशात या संपूर्ण योजनेसाठी सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून, त्याद्वारे ही योजना कार्यान्वित करण्यात होत आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये या यंत्रणेची उभारणी करण्यात येत असून, त्यासाठी राज्य शासनातर्फे कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकल्पावर 'इस्रो'चे नियंत्रण राहणार आहे. केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनातर्फे संयुक्तरीत्या हाती घेण्यात आलेला हा प्रकल्प राज्य सरकार राबविणार आहे. राज्य- जिल्हा आणि स्थानिक पातळीवर निर्माण होणाऱ्या साथरोग उद्रेकाचे नियंत्रण याद्वारे करण्यात येणार आहे. 'व्ही-सॅट'द्वारे (व्हेरी स्मॉल ॲमॅटूर टर्मिनल्स) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा या योजनेत राज्यातील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत कार्यान्वित करण्यात आली असून, एका 'व्ही-सॅट'वर ४०० साइट उपलब्ध राहणार आहेत. यात भारतातील महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल प्रदेश यांसह १४७ वैद्यकीय महाविद्यालये जोडण्यात येत आहेत.

**नागरिकांना आवाहन**

जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. खडसे व डॉ. वडनेरकर यांच्या नियंत्रणाखाली जिल्ह्यात साथरोगाचे सर्वेक्षण सुरू झाले आहे. यात जिल्हा सर्वेक्षण अधिकारी मावळे, साथरोग आरोग्यविस्तार अधिकारी पी. व्ही. नेमाडे, लेखापाल किशोर पाटील, माहिती व्यवस्थापक संदीप पाटील आदी कामकाज पाहत आहेत. जिल्ह्यात कोठेही साथसदृश स्थिती किंवा रुग्ण आढळल्यास नागरिकांनी आरोग्य विभागाशी संपर्क साधावा, असेही डॉ. वडनेरकर यांनी सांगितले.